# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46
E-mail : ronagpur.dte@gmail.com

कार्यासन दु. क्र. 0712-6465145
Website: rdtenagpur.org.in

**अतितात्काळ**

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/पडताळणी/2016/ 2442
दिनांक:- 25 AUG 2016

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विद्यापीठ संचालित
विनाअनुदानित तसेच कामय विनाअनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता राखीव प्रवर्गात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीबाबत .

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. 2अ/एडीएम/2016/1135, दि. 20/8/16

शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या प्रवर्गाच्या (ST/VJ/NT) व अपंगत्व साठी राखिव असलेल्या जागेवर केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश देण्यात आलेल्या काही उमेदवारांच्या संदर्भात प्रवर्गाबाबतचे प्रमाणपत्र जसे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र इत्यादी बनावट असल्याची तक्रार तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना प्राप्त झाल्या. सदरहू प्रमाणपत्रे संबंधीत निर्गमित करणाऱ्या प्राधिकरणाकडे सत्यता पडताळणी करण्यासकरीता पाठविले असता काही उमेदवारचे अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या प्रवर्गाच्या (ST/VJ/NT) व अपंगत्वाचे प्रमाणपत्र बनवट असल्याबाबतचा अहवाल संबंधीत प्राधिकरणाकडून तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई प्राप्त झाला आहे.

वरील बाब विचारात घेऊन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि अपंग (ST/VJ/NT/Person with Disablility (PWD) या राखीव प्रवर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रे निर्गमित करणा-या संबंधीत प्राधिकरणाकडे आपल्या स्तरावर पाठवून त्याबाबतची सत्यता पडताळणी तात्काळ करून घेण्यात यावी.

सदरहू प्रकरणी आपणास तात्काळ कार्यवाही करावयाची आहे. त्याबाबतचा अहवाल तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई व महाराष्ट्र शासनास सादर दि. 16 सप्टेबर 2016 पर्यंत सादर करावयाचा असल्याने **आपल्या संस्थेव्दारे केलेल्या सर्व कार्यवाहीचा अहवाल न चुकता या कार्यालयास सादर करावा. संबंधीत प्राधिकरणाकडून आपणास प्रमाणपत्र सत्यतेबाबत अहवाल प्राप्त होताच या कार्यालयास लगेच कळवावे.**

तसेच दरम्यानच्या कालावधीत वर नमुद केल्यानुसार अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि अपंग या प्रवर्गात प्रवेशीत विद्यार्थ्यांस प्रवेश रद्द करावयाचा असेल तर विद्यार्थ्यांचा प्रवेश संस्थास्तरावर रद्द करावा. **मात्र संबंधीत विद्यार्थ्यांला ज्या प्रवर्गात प्रवेश मिळाला असेल तर त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र तसेच अपंगत्वाचे प्रमाणपत्रा व्यतिरिक्त** इतर प्रमाणपत्र

विद्यार्थ्यांना परत करण्यात यावेत व सदर प्रमाणपत्र संबधीत निर्गमित करणाऱ्या प्राधिकरणाकडे प्रमाणपत्राची सत्यता पडताळणीसाठी पाठविण्यात यावी. **तसेच सदर प्रमाणपत्र तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे सुचनेनुसार पुढील कार्यवाहीसाठी संस्थेत ठेवण्यात आले असून प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या प्राधिकरणाकडून पडताळणी झाल्यानंतर सदर प्रमाणपत्रे परत करण्यात येतील, या आशयाचे लेखी पत्र तसेच सदर प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती संबंधीत विद्यार्थ्यांस देण्यात याव्यात.**

वरील बाबींची सर्व संस्थेने तात्काळ कार्यवाही करावी व प्रमाणपत्र निर्गमित प्राधिकरणाकडे पाठविल्याचा अहवाल व प्रमाणपत्र निर्गमित प्राधिकरणाकडून प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबतचा अहवाल प्राप्त होताच या कार्यालयास अवगत करावे.

**सहपत्र:-** वरीलप्रमाणे संदर्भिय पत्र.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

D:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc